# प्रकरण पांचवे

## विद्रोही तुकाराम व तुकाराम दर्शन यांची तुलनात्मक मांडणी

सदानंद मोरे यांनी तुकाराम दर्शन या पुस्तकाद्वारे महाराष्ट्राच्या सर्व सांस्कृतिक परंपरेचा एक दमदार आणि त्याचवेळी एक सडेतोड असा वेध घेवून पुढची वाटचाल कशी करावी याचे स्पष्ट दिग्दर्शन तुकाराम महाराजांच्या जीवन कार्यातून केली आहे. तुकारामाची सर्व बाजूने सांगोपांग ओळख त्यांनी या पुस्तकातून केली आहे.

आ. ह. साळुंखे यांनी विद्रोही तुकाराम या आपल्या पुस्तकाद्वारे तुकारामाचे मूळ व्यक्तिमत्व समजावून देताना त्यांनी तुकारामावर आतापर्यंत झालेल्या अन्यायाचा तसेच तुकारामावर आतापर्यंत झालेल्या विकृत लिखाणाचा आढावा घेतला असून सामाजिक न्यायासाठी लढलेल्या तुकारामांच्या जीवनातील सत्य उलगडण्याचा प्रयत्न इथे केलेला आहे.

ज्याला महाराष्ट्राचा आणि मराठी संस्कृतीचा अभ्यास करावयाचा आहे त्याला तुकोबा ही मोक्याची जागा पकडावी लागेल तुकोबा हा सांस्कृतिक टेहळणीसाठी मोक्याचा बुरूज आहे येथून चौफेर दृष्टिक्षेप टाकता येतो आणि एरवी नजरेतून सुटणाऱ्या अनेक बाबी टिपता येतात त्यांच्या मते तुकोबा एक सम्यक सांस्कृतिक परिप्रेक्ष्य आहे. म्हणूनच तुकोबांच्या व्यक्तित्वाचा वेध थेट ज्ञानदेवापर्यत खरे तर पुडलिकापर्यंत पोहचला व दुसऱ्या बाजूला शिवकाल उत्तर मराठेशाही, पूर्वोत्तर पेशवाई आणि अव्वल इंग्रजी काळातील प्रबोधन इत्यादी टप्पे ओलांडता थेट इथे आणि आता जिवन वर्तमानात उतरतो.

तुकाराम दर्शन या पुस्तकाचा उहापोह हा तुकाराममरूप महाराष्ट्र संस्कृतीचे मुल्याधिष्ठित व सर्जनशील विश्लेषण करण्याचा प्रकल्प आहे. या पुस्तकांत तुकोबांचा गौरव अथवा उन्नयन करण्याचा खटाटोप नाही. तुकोबांचा मोठेपणा इतका आहे की असल्या गोष्टींची त्यांना गरज नाही. मराठी संस्कृतीची चोख समिक्षा व्हावी. आणि त्याकरिता तुकोबांच्या दर्शनाचा अंजन म्हणून उपयोग व्हावा अशी त्यामागची धारणा आहे.

तुकाराम दर्शनाची मांडणी डॉ. मोरे एका विशिष्ठ सामाजिक सांस्कृतिक संदर्भात करतात एकाच परंपरेत वेगवेगळे अंतःप्रवाह संभवतात मतभेदीही संभवतात हया वस्तुस्थितीची जाणीव मनाशी सदैव बाळगत बाळगत महाराष्ट्रील प्राचीन, अर्वाचीन तसेच सनातनी पुरोगामी तसेच ब्राम्हण, ब्राम्हणेत्तर, परंपरांनी तुकोबांकडे कोणत्या दृष्टीने पाहिले त्यांना कोणत्या प्रकारचा प्रतिसाद दिला, याचा विचार मांडताना हे संदर्भ महत्वाचे ठरतात.

तुकाराम दर्शन हा लेखन व्यवहार हा बहुजन समाजातून आलेल्या आणि सुक्ष्म चिंतनाचे सामर्थ्य अंगी बिंबवलेल्या पिढीचा एक पथदर्शक अविष्कार आहे साहस वादी एकांगी भुमिका टाळून आत्मटीकेचे महत्व जाणून त्याच वेळी सांस्कृतीक संचिताचे प्रेरणादायी असे विवेचन करणे ही गोष्ट मुळात फार कठीण आहे पण डॉ. मोरे यांनी ती समर्थपणे पार पाडली आहे. असे प्रस्तावतेत राम प्रधान लिहतात.

तुकाराम दर्शन या पुस्तकात मराठी साहीत्यकारांनी आणि समिक्षकांनी तुकोबांकडे कवी म्हणून कसे पाहीले त्याना काय प्रतिसाद दिला याचा अत्यंत व्यापक सर्वसमावेशक चिकित्सक , अभिनव आणि वर्तमानकालीन चिंतन व संशोधनाला नवी दिशा सुचविणारा विचार मांडला आहे.

डॉ मोरे यांची मांडणी व त्यातला सूक्ष्मणणा आपल्याला जाणवतो अत्यंत कठिण असे काम अत्यंत अभ्यासपूर्ण तसेच सहजपणे तुकारामांच्या टीकांकाराचे असत्य मोरे यांनी अलगद पणे उकलून दाखविले आहे.

हे पुस्तक वाचताना तुकारामांनाबद्दल अनेकांनी जे खोटे आरोप मांडले त्या लोकांना दोष न देता त्या लोकांनी केलेले आरोप कसे व किती चुकीचे आहे हे फुलाच्या पाकळया अलगद उमलतात तसे अुमलून दाखवले आहेत अुदा. विनायक लक्ष्मण भावे ( महाराष्ट्र सारस्वत हा ग्रंथ लिहून मराठी वाङ्‌मयाच्या इतिहासाठी योगदान करणारे भावे यांनी तुकारामांचे दर्शन शक्य तेवढया विकृत रीतीने घडविण्याचे काम करण्यात ही मंडळी गर्क होती. त्यांनी तुकाराम – रामदास ही तुलना संक्षिप्त व सौम्य स्वरूपात उधृत केली या तुलनेवर लेखक तुकारामानाच्या एका अभंगाने उत्तर देतात.

अनेक विचावंताना अनेक लेखकाना, तर्कतीर्थना तुकाराम कसे दिसले भावले याची सखोल मांडणी या पुस्तकात आहे. तुकाराम तुलना शेक्सपिअरशी कशी होती याचीही नोंद यात येते. तुकारामावर अनेक लिहिलेली चरित्रे त्यातील सत्य असत्य मांडण्याचा प्रयत्न ही या पुस्तकात केलेला आहे.

लेखकाने तुकाराम दर्शन त्यांच्या समकालीनापासून आताच्या लेखकाच्या समकालीकापर्यंत तुकारामाचे जे अस्तित्व आहे त्याचा अत्यंत अभ्यास पूर्ण वेध घेतला आहे. लेखक म्हणतात तुकोबा हे डांळीबासारखे आहेत. डाळिबांची अंतरंग रचना अत्यंत गुंतागुंतीची असते. बाहेरचा सालीवर मोहक रंगछटा असतात खऱ्या पण शेवटी ती सालच तर कोणी ग्राम्यतेच्या भीतीपोटी तर कोणी औचित्याच्या

दडपणामुळे त्यांच्यापासून दूर राहीली तुकाराम दर्शन घडविण्याची लेखकाची पद्धती थोडी वेगळी आहे लेखकाच्या पूर्वसुरीना तुकोबा कसे दिले कसे समजले याच दर्शन लेखकाने पहिल्यांदा मांडले आहे. त्याच दर्शनाचे वर्णन इथे लेखकाने केले नाही पण त्या दर्शनाचे विश्लेषण करून त्यांची काही कारणमीमांसा लेखकाने केली आहे. तुकोबांच्या व्यक्तिमत्वाचे काणते पैलू , कोणाला दिसले कोणते, दिसले नाहीत, का दिसले नाहीत इत्यादी प्रश्नांचा चर्चा इथे केली आहे आणि त्यातूनच तुकोबांचे दर्शन आपोआप घडते

विद्रोही तुकाराम हे आ. ह. साळुंखे यांचे पुस्तक तुकारामाच्या चरित्राचा कार्याचा व काव्याचा समग्र सर्वांगीण परीपूर्ण आढावा घेणे वा मूल्यमापन करणे हे प्रस्तुत पुस्तकाचे स्वरूप नाही. तुकारामांच्या जीवनाकडे लेखक ज्या दृष्टीने पाहातात त्यादृष्टीचे ओझरते स्वरूप वाचकापुढे ठेवणे एवढाच मर्यादीत हेतु इथे लेखकाचा आहे. विशिष्ठ मतांचे खंडण मंडण करणे हेही या पुस्तकाचे स्वरूप वा उदिष्ट नाही. तुकारामांच्या अभंगातून व्यक्त होणारी त्यांची जीवनविषयक भूमिका संक्षेपाने मांडणे हे उद्दिष्ठ डोळयापुढे ठेवून आ. ह. साळुंखे यांनी लिखाण केलेले आहे. असे करताना लेखकाने तुकारामांच्या नावावर घुसडण्यात आलेल्या अभंगाची दखलीही घेतली नाही वा त्याचे खंडणही केले नाही. तुकारामांच्या अभंगामध्ये प्रक्षेप झाले याची चर्चा मात्र केली आहे.

तुकारामांनी प्रस्थापित समाजामध्ये असणाऱ्या विषमतेविरूद्ध व समते करीता लढा दिला वरीष्ठ वर्गाविरूद्ध बंडाचा झेंडा उभारला या बंडखोर संताची बाजू या पुस्तकात मांडली आहे तुकारामावर जो अन्याय झाला तो समजावा ही या पुस्तकामागची लेखकाची भावना आहे. तुकारामावर झालेला अन्याय तसेच त्यांच्या जीवनातील घटना त्यातील सत्य उलगडण्याचा, सत्य सांगण्याचा प्रयत्न लेखकाने केला आहे.

लेखकाने अत्यंत परखड भाषेत व तसेच तुकारामांच्या दुर्लक्षिलेल्या बाबीवर लेखकाने लक्ष केंद्रीत केले आहेत. त्याची चर्चा केली आहे. हया दुर्लक्षिलेल्या बाबी

म्हणजे तुकारामावर केलेला आपण अन्याय होय याची जाणीव होते. जाणुनबूजून खरा तुकाराम आपल्या पासून लपून ठेवला होता हे समजते. आजच्या समाज जीवनाला खरोखरीच तुकाराम हवा होता किंवा त्यांच्या विचाराचा वारसा जपणारा तुकाराम निर्माण व्हायला हवा याची जाणीव होते.

उच्चवर्णीयांच्या हातात असलेली सत्ता व त्यामुळे घडणारी विषमतेच्या व्यवहारात मिळणारी प्रतिष्ठा यासाठी तुकारामांनी दिलेला लढा मनामध्ये व्यक्तिमध्ये स्वातंत्र्याची जाणीव करून देईल इतके सुंदर दर्शन आ. ह. साळुंखे यांनी घडवले आहे. उद्दिष्ट मात्र एकच आहे संत तुकारामांच्या गाथेचा तळ शोध शोधत तुका आकाशाएवढा कसा आहे हे जगभराच्या जिज्ञासूना दाखवून देणे.

आ. ह. साळुंखे यांच्या विद्रोही तुकाराम व सदानंद मोरे यांच्या तुकाराम दर्शन या दोन ग्रंथाची तुलनात्मक अभ्यास करताना जाणिवलेल्या गोष्टी

विद्रोही तुकारामाच्या मांडणीत एकसंघपणा आहे तर सदानंद मोरे यांच्या मांडणीमध्ये एकसंधपणा नाही. सदानंद मोरे यांनी १०८ च्यावर स्वतः लिहलेल्या लेखांचे संकलन केले आहे व त्याचा ग्रंथ निर्माण केला आहे. विद्रोही तुकारामाचे लिखाण हे ग्रंथाच्या निर्मितीचा हेतु धरूनच केलेले आहे.

आ. ह. साळुंखेच्या लेखनात स्पष्टवक्तेपणा परखड भाषेत मांडलेले तुकाराम दिसतात तर सदानंद मोरे यांनी स्पष्ट मते पण सौम्य भाषेत मांडले आहेत आ. ह. साळुंखे यांनी कोण काय म्हणतो यापेक्षा तुकाराम काय म्हणतो याचे विवेचन केले आहे तर मोरे यांनी इतरांची तुकारामाबद्दल मते काय आहेत याचे विवेचन केले आहे. विद्रोही मध्ये अभंगापेक्षा अभंगातील गाम्याचे महत्व व अर्थ मांडला आहे, तर तुकाराम दर्शनमध्ये अभंग मांडून अर्थाची चर्चा केलेली आहे. साळुंखे यांनी ब्राम्हणवादाच्या चौकटीचा तुकारामाच्या चष्म्यातून अभ्यास केला आहे, तर सदानंद मोरे यांनी ब्राम्हणवादाला अलगद हातांनी निसटता स्पर्श केला आहे.

आ. ह. साळुंखे हे सत्यतेच्या कसोटीवर तुकारामचे दर्शन घडवतात तर सदानंद मोरे मत मतांतराच्या परामर्श घेत तुकारामाचे दर्शन घडवतात. आ. ह. साळुंखे ची भाषा कुणाची तमा न बाळगता येणाऱ्या कोणत्याही प्रसंगाला सामोरी जाणारी आहे तर सदानंद मोरे यांची भाषा सौम्य वळनाने वळसे घेत घेत मांडलेली आहे. आ. ह. साळुंखे यांचे लिखाण बिनधास्तपणे मांडलेले दिसते तर सदानंद मोरे यांचे लिखण सावधपणे केलेले वाटते.आ. ह. साळुंखे अभ्यासू विद्वान विचारवंत बुद्धीमान लेखक आहेत तर सदानंद मोरे बहुश्रूत विद्वान सखोल विचारवंत लेखक आहेत.

आ. ह. तुकारामाच्या विचारांचे वारसदार,, तर सदानंद मोरे तुकारामांचे रक्तसंबंधाचे वारसदार आ. ह. नी दुर्लक्षिलेल्या गोष्टीवर त्या महत्वाच्या आहेत हे समजुन भर दिलेला आहे. तर सदानंद मोरे यांना त्या गोष्टी महत्वाच्या वाटत

नाहीत.

**विद्रोही तुकाराम**

**लेखक – आ. ह. साळुंखे**

मार्क्सपूर्वी दोनशे वर्षे डी क्लास झाले.

कर्जखते बुडविण्याची कृती ही मानवी इतिहासातील एक अत्यंत दुर्मिळ घटना स्वतःच स्वताच्या संपतीचे सत्तेचे वा अधिकाराचे विसर्जन करणे ही काही सामान्य घटना नव्हे. ज्यांच्या नैतिक जाणीवा अत्यंत विकसित झालेल्या असतात. ज्यांचा विवेक अत्यंत स्थिर असतो आणि ज्यांच्या मानव्याविषयीच्या संकल्पना अत्यंत उच्च कोटीच्या असतात, अशी फार मोजकी माणसे अशाप्रकारचा निर्णय घेत असतात. तुकाराम हे अशा मोजक्या लोकापैकी एक होते असाधारण म्हणता येईल अशी आचार विचारांची परिपक्वता तुकारांमानी ऐन विशीत दाखविली यावरून त्यांच्या माणूसपणाची उंची कळून येते. मार्क्सने साम्यवाद आणि समाजवाद सांगण्यापूर्वी सूमारे दोनशे वर्षे तुकारामाने आपल्या वर्गीय हितसंबंधाचे विसर्जन करून मोकळे झाले होते., वर्गहीन झाले होते, डी क्लास झाले होते जी दया पुत्रावर करायची , तीच दया दास आणि दासी यांच्यावर करायची हा समतेचा सिद्धांत पुढच्या काळास त्यांच्या तोंडी शोभून दिसला कारण त्या सिद्धांतला त्यांच्या आचरणाचे अधिष्ठान होते परद्रव्याला विटाळ मानावे आणि जो या विटाळापासून दूर असतो त्याला ओवळा समजावे अशी सोवळा ओवळयाची त्यांनी केलेली व्याख्याही त्यांना शोभून दिसली कारण कर्जखते बुडवण्याच्या रूपाने त्यांनी स्वतःला चिकटणारा परद्रव्याचा विटाळ झटकून याबाबतीत पूर्ण सोवळेपण प्राप्त केले होते

विद्रोही तुकारामात आ. ह. साळुंखे यांनी कर्जखते बुडविण्याची कृती ही असामान्य कृती आहे या कृतीचा लेखकाने मोठा परामर्श घेतला आहे त्यांनी या गोष्टीला फार मोठे महत्व दिले आहे. कारण तुकारामाच्या जीवनातील कार्याचे ते महत्वाचे पाऊल होते आ. ह. साळुंखे यांना ही कृती समाजाने अंधारात का ठेवली याचा राग येतो. सदानंद मोरे यांनी या कृतीकडे फारसे लक्ष दिले नाही याचा मला

राग येतो एवढी मोठी घटना ती मोरे यांनी का दुर्लक्षिली तिच्याकडे का फारसे लक्ष दिले नाही.

## तुकाराम दर्शन

## लेखक – सदानंद मोरे

दुष्काळाने गांजलेल्या आपल्या कुळांना ऋणकोना कर्ज माफ करून तुकाबांनी आपल्या वाटयाची खतपत्रे इंद्रायणीत बुडविली कान्होबांच्या वाटयाला आलेली खतपत्रे कान्होबा बुडवू शकले नाहीत. तेव्हा त्यांना लौकिंक धनाचे महत्व वाटत होते तुकारामाच्या मृत्युनंतर कान्होबांना तुकारामाच्या अलौकिक धनाचे महत्व पटले. त्या परमार्थ महाधनाचे कान्होबा कुलपरंपरेने वारसदार आहे.

## विद्रोही तुकाराम

## लेखक – आ. ह. साळुंखे

### वेंदाचा तो अर्थ आम्हासीच ठावा.

शुद्राना वेदांचा अधिकार नाकारणारी व्यवस्था तुकारामांनी निमुटपणे स्वीकारली होती तिच्या विरूद्ध त्यांनी विद्रोह केला होता. तुकारामाचे विचार म्हणजे त्यांनी वैदिक पंडिताना दिलेले एक विलक्षण आव्हान होते वेदांचा अर्थ आम्हालाच कळला आहे हे त्यांचे म्हणणे वाच्यार्थाने मुळीच खरे नाही हे उघड आहे कारण त्यांना वेद ऐकायला वाचायला वा शिकायला मिळालेच नव्हते पण त्यांचे विधान व्यंगार्थाच्या दृष्टीने खरे आहे अस्सल आहे केवळ वेदामधील नव्हे तर वेदांच्या पलीकडे जाणारा अर्थही आपल्या अभंगातुन व्यक्त होतो असे ते म्हणतात. सर्वांचा आत्मा एक आहे. समत्व हे ब्रम्हाचे स्वरूप आहे सर्व प्राण्यांच्या अंर्तयामी एकच इश्वर असतो हे वेदांतील समतेचे विचार वैदिक पंडिताना कधी कळलेच नाहीत आणि तुकारामांनी मात्र वेदांचे शब्द न वाचताच ते विचार प्रत्यक्ष आचरणात आणले मग वेदांचा हा अर्थ कुणाला कळला म्हणायचे आणि कोण नुसता ओझे वाहु आहे म्हणायचे.

तुकाराम दर्शन

लेखक – सदानंद मोरे

वेदांमध्ये असलेले कांही आशय तुकोबांच्या अभंगातून व्यक्त होतो याचा अर्थ तुकोबांचे अभंग, वेदांचे अभंग अनुवाद किंवा भाषांतर आहे असा मात्र नाही. तुकोबांना मुळात वेदांचा अधिकार नसल्यामुळे अशा प्रकारचे भाषांतर करण्याचा प्रश्न उपस्थित होत नाही. साहजिकच अवघड संस्कृत सामान्य माणसांना बायाबापडयांना कळत नाही. म्हणून संस्कृतातले अवघड संतानी सोप्या मराठीत आणले हे म्हणणे बाळबोध संस्कृत अभिमानाचे द्योतक ठरते भाषा निरपेक्षपणे नोंदणारा अर्थ किंवा ज्ञान किंबहुना जसा वैदिक ऋषी संस्कृतातून व्यक्त करू शकले तसाच तो संतानी मराठी भाषेतून व्यक्त केला अर्थात त्यांच्यात साम्य असल्याने आणि संस्कृत मराठीची पूर्ववर्ती भाषा असल्याने तो अनुवाद किंवा सुलभीकरण वाटणे स्वाभाविक झाले एवढेच. साक्षात इश्वरी स्फूर्ती हीच आपल्या ज्ञानाचा आणि वाणीचा उगम आहे असे तुकोंबा सांगतात अर्थात वैदिक ऋषींचे मंत्रही अशाच स्फूर्तीतून निघालेले असल्याने काही बाबतीत वेदांचे व अभंगाचे साम्य असणारे हे उघड आहे. या अर्थसाम्याचे मूळ वेद नसून वेदांचे जे मूळ म्हणजे इश्वर आहे अशी तुकोबांची धारणा होती. आपले कवित्व ही इश्वरी प्रसादामधून निर्माण झालेल गोष्ट आहे अशी त्यांची धारणा आहे. त्याच्याशी ग्रंथाच्या वाचनाचा तार्किकतेचा संबंध नाही.

हया घटनेत दोनही लेखक एकाच पायरीवर येवून थांबतात परंतु दोघांच्या मांडणीचे स्वरूप वेगवेगळे आहे.

तुकाराम दर्शन हे सदानंद मोरे यांचा ग्रंथ हा तुकारामाच्या जीवनाचा सखोल सर्वांगीण अभ्यास आहे त्यामुळे अनेकांच्या चष्म्यातून तुकाराम कसे दिसले व त्यांनी कसे मांडले का मांडले तुकारामाच्या समकालीकापासून लेखकाच्या समकालीकापर्यंत तुकारामांचे झालेले दर्शन लेखकाने मांडले आहे.

विद्रोही तुकाराम या ग्रंथात आ. ह. साळुंखे यांनी तुकारामांची समाजाने जी उपेक्षा केली काही सत्य घटना उच्चवर्णियांनी समाजापासून लपवून ठेवल्या या

सा–या गोष्टींचा परामर्श विद्रोही तुकाराम या ग्रंथात घेतला आहे.

**विद्राही तुकाराम**

**लेखक – आ. ह. साळुखे.**

**ब्राम्हण्यांची चौकट मोडावी लागेल**

इतर लेखक जेव्हा एखाद्या विषयावर लेखन करतात तेंव्हा त्या विषयाला अनुसरून योग्य ती चौकट तयार करीत नाही तर त्यांच्याकडे अगोदरच ती तयार असते. या चौकटीला ब्राम्हण्याची चौकट असे म्हटले तरी ते गैर अवास्तव वा अतिशीयोक्त ठरणार नाही ते जेव्हा लेखनाला सुरवात करतात तेव्हा विषय कोणताही आला तरी ते त्याला चौकटतीच बसवतात तो बसू शकत नसला तरी मारून मुटकून बसवताना त्यांची छाटणी तासणी करून बसवतात या प्रयत्नाात त्यांची चौकट शाबून राहते विषय मात्र अनेकदा रक्तबंबाळ होतो त्याचे लचके तोडले जातात. चौकट प्रभावी राहते विषय मात्र निष्प्रभ होतो. गुदमरला कोमेजून जातो. विषयाचे स्वरूप, आवाका वगैरे पाहुन चौकटीला आकार दिला जात नाही. तर चौकटीच्या तुरूंगात विषयाच बंदिस्त होवून जातो तुकारांमाचे चरित्र लिहीतांनाही या लेखकांकडे ही चौकट तयार असतेच स्वाभाविकच वैदिक ब्राम्हणी हितसंबधानांना उसळू दयायचे नाही हे या लेखकांचे मूलभूत गृहीतक असते.

तुकारामाविषयची आदर असल्याचे कितीही दाखविले तरी या गृहीतकावर एखादा पुसटसा ओरखडा ही उठणार नाही याची हे लेखक खबरदारी घेतात. याचे विवेचन पुढे अनेक ठिकाणी केले आहे. पण तुकारामांचे वास्तव व्यक्तित्व समजावून घेण्यासाठी लेखकाने इतर लेखकांनी वावरलेली चौकट मोडून काढली आहे.

तुकाराम दर्शन

लेखक – सदानंद मोरे

कलशस्थानी असणाऱ्या तुकोबांमध्ये वारकरी परंपरेची आणि मराठी संस्कृतीची

गुणवैशिष्ठ सारभूत होवून प्रगटली आहेत. त्यामुळे आपोआपच तुकाराम दर्शन हे मराठी संस्कृतीचेही दर्शन झालेशिवाय तुकोबांच्या एवढा प्रभाव या संस्कृतीवर आहे की गेल्या सडितीनशे वर्षामधील तुकाराम आकलनाचा नुसता आलेख काढला तर त्यातून मराठी संस्कृतीचे सारे धागे ताण तणाव अंतःसंघर्ष स्पष्टपणे दिसू लागतात. एरव्ही नजरेतून सुटणाऱ्या अनेक बाजू नजरेच्या टप्पात येतात तुकोबा हे महाराष्ट्राचे जणू सांस्कृतीक पुरूष आहेत. त्यांचे दर्शन हे महाराष्ट्राच्या सांकृतिक इतिहासचेही दर्शन झाले असे लेखक म्हणतात.

वारकरी संप्रदायाची खूण म्हणून गळयात माळ घालतात ती १०८ मण्याची असते. डॉ. मोरे यांची लेखमालाही १०८ लेखांची असून नंतरचे काही लेख त्याला पूरक म्हणून समाविष्ट केले आहेत. एखादया साप्ताहिकामधून एखादया मुलभूत तात्विक विषयांची तीही नवी अशी मांडणी करणे सोपे नसते अशावेळी आपल्या १०८ लेखांच्या धारावाही मांडणीत त्या मर्यादा ओलांडून मोरे यांनी मराठी संस्कृतीचे व तिच्या भागवत संप्रदायी सत्वधारेचे स्वरूप साररूपाने आपल्या पुढे मांडले आहे असे प्रस्तावनेत राम प्रधान म्हणतात.

कोणी गुरू नाही कोणी शिष्य नाही

लेखक – आ. ह. साळुंखे

गुरू म्हणून वावरणारे आणि त्या जोरावर प्रतिष्ठेचे जीवन जगत सुखोपभोग घेणारे कित्येक गुरू लोक आपल्या समाजात आढळतात. बहुतेक वेळा अशा लोकांचे आचरण अनेक विकृतीनी भरलेले असते आपल्या भोवती आपल्या सारख्याच ढोंगी शिष्यांचा मेळा जमवून त्यांना व लोकांना खोटा नाटा उपदेश करणारे पण मनामध्ये धन, स्त्री सुख पक्वान्ने आणि इतर अनेक प्रकारचे उपयोग यांची अभिलाषा धरणारे ढोंगी गुरू तुकारामाच्या कालातही खूप होते तुकारामानी त्यांची नमुनेदार चित्रे अनेक अभंगातून रेखाटली असून त्यांची कडक हजेरी घेतली आहे.

खरे पाहता तुकारामांचा गुरूशिष्यांवर विश्वासच नव्हता त्यांच्या मते एका

माणसाने गुरू बनायचे. आणि दुसऱ्याने शिष्य बनायचे अशाप्रकारचे वर्तन हे अधम लक्षण होय सर्व प्राणिमात्रामध्ये नारायण असतो त्यामुळे जसे आपण तसाच दुसरा मनुष्य होय अशा स्थितीत दुसऱ्या माणसाला गुरू अथवा शिष्य मानणे योग्य नव्हे संसारी लोकाच्या दृष्टीने गुरूचे हे काही ईश्वर प्राप्तीने साधन होवू शकत नाही. गुरूचा वचनामुळे नारायण अंतरत असेल तर गुरूचे ते वचन मानू नये मानवी गुरूची आवश्यकता नाही असे तुकारामांनी सांगितलेले याच तत्वाची दुसरी बाजू स्वाभाविकपणे आपल्यापुढे येते. गुरू नको म्हणजे याचा अर्थ शिष्य नको असाही आपोआपच मिळतो तुकारामानी आपल्या आयुष्यात या दोन्ही गोष्टी पाळल्या होत्या त्यांनी विठ्ठलाला गुरू मानले परंतु दुसरा कोणताही मानवी गुरू केला नाही त्याच बरोबर त्यांनी कोणाला शिष्य केले नाही म्हणूनच माझी शिष्य शाखा नाही असे अगदी निःसंदिग्धपणे ते म्हणू शकले ते सर्व समाजाला उपदेश करीत होते शिष्य होण्याची इच्छा करणाऱ्या मोजक्या लोकांनाच उपदेश करायचा अशी मर्यादा घालून न घेता उपदेशाची याचना न करणाऱ्या सर्वलोकांना देखील ते हिताच्या गोष्टी सांगत त्यामुळेच एका अभंगात ते म्हणतात " गुरूने मेघवृष्टी प्रमाणे सर्वांना समान रीतीने उपदेश करावा त्यांच्यापैकी एकालाच निवडून आपला शिष्य मात्र करू नये नाही तर त्या गुरूला शिष्याचा पापाचा अर्धा वाटा लागेल गुरूशिष्य संबंधीच्या एक अत्यंत असाधारण विचार मांडताना मन हेच आपले गुरू असते आणि मन हेच आपले शिष्य असते असे त्यांनी म्हटले आहे. माझा मीच प्यालो आणि स्वतःच आपल्या स्वतःच्या पोटी जन्माला आलो असा एक उत्तुंग आशयाचा विचार त्यांनी मांडला आहे.

धार्मिक सामाजिक जीवन कलुषित करणाऱ्या ढोंगी धनलोभी आणि सुखलोलुप गुरूशिष्यावर केलेले प्रहार हे जनहिताच्या तळमळीतून निर्माण झाले होते समाजसुधारणेच्या दृष्टीने त्यांची आवश्यकता होती. या प्रकारच्या गुरूशिष्यांनी लोकांना फसवल्याचे एक शास्त्रच विकसित केले होते गुरूचे माहाम्य वाढविण्यासाठी शिष्यांनी प्रचाराची एक यंत्रणाच उभी केली होती. अर्थात हे गरूशी संगनमत करून

त्याच्या संमतीने चालत होते आपला गुरू निःस्पृह आहे असे एकीकडून सांगायचे अणि दुसरीकडून अत्यंत कौशल्याने लुबाडायचे या प्रकारात हे शिष्य पारंगत असत प्रसंगी गुरू आणि शिष्य एकमेका नाही फसवत या लोकांचे वर्तन म्हणजे धर्माची विटंबनाच होय.

तुकारांमाना जर मानवी गुरू करायचा असता तर संत नामदेव हे त्यांचे गुरू बनू शकले असते कदाचित ज्ञानेश्वर एकनाथ अथवा कबीरही त्यांचे गुरू बनू शकले असते कारण या सर्वांशी त्यांचे एक वैचारिक नाते होते. पण तुकारामानी यापैकी कोणलाही गुरू मानले नाही संत नामदेव हे तर जणू काही त्यांचे ह्रदय होते. याला महाराष्ट्राचा सामाजिक इतिहास साक्षी आहे तुकारामांना लोकांनी नामदेवाचा अवतार मानले यावरून त्या दोघांचे वैचारिक नातेस्पष्ट होते.पण तुकारामांनी त्या नामदेवानांही गुरू मानले नाही गुरू मानले ते फक्त पांडुरंगाला आणि त्या पांडूरंगाचा अनुग्रह प्राप्त होण्याला संत नामदेव फक्त साहाय्यभूत झाले अशी भूमिका घेतली.

नव्हे हे गुरूत्व मेघवृष्टी वाणी –

तुकाराम दर्शन – सदानंद मोरे.

स्वतः तुकोबांनी मात्र कोणाचे गुरूत्व पत्करले नाही उलट मेघवृष्टीने उपदेश करण्याचा आदेश दिला ही मेघवृष्टी त्यांच्या हयातीत प्रत्यक्ष ऐकणाऱ्यांनी व त्यांच्या पश्चात गाथा वाचून ग्रहण करणाऱ्यांनी त्यांना गुरूस्थानी मानले हा भाग वेगळा.

आपल्या प्राचीन परंपरेत आणि विशेषतः तंत्रमार्गात व वेदांतात सुध्दा गुरूला फार महत्व देण्यात आले आहे याचे एक कारण म्हणजे गुरूकडे काहीतरी विद्या असून ज्याच्यावर तो प्रसन्न होईल त्यालाच ती मिळेल इतकेच नव्हे तर एखादा अतिशय शहाणा शिष्य अन्य एखाद्या उपायाने ती मिळवू पाहील तर ती सफल तर होणार नाही परंतु प्रसंगी विपरीत फळही देईल अशी धारणा आपल्या परंपरेत आहे. अध्यात्म विद्येतील अथवा साधनेमधील ही धारणा लौकिक क्षेत्रामध्येही

झिरपली असल्याचे दिसून येते. उदा – परशुरामाने कर्णाला दिलेली धनुर्विद्या शाप देवून परशुराम विफल करू शकतो. तर द्रोणाचार्य एकलव्याचा अंगठा गुरूदक्षिणा, म्हणून कापून घेवू शकतात. गुरूसेवा इ.संबंधी आपल्या प्रचलित असलेल्या समज असमंजाचा धांडोळा घेतला, या संदर्भातील प्रचलित आख्यायिका गोळा केल्या तर विशिष्ठ गरजामुळे ज्याची सूचनशीलता वाढलेली आहे अशा शिष्यवर्गाची फसवणूक आणि शोषण करणे फारसे अवघड नाही हे सहज ध्यानात येईल हे शोषण कधीकधी शिष्यांच्या बायकांच्या प्रथमोउपभोगाच्या विशेषाधिकारापर्यंत जाते ही बाब धर्माच्या अभ्यासकांना अज्ञात नाही थोडक्यात फसवणूक व भ्रमनिरास हा नियम चांगला अनुभव हा अपवाद असेच या संस्थेचे वर्णन करता येईल.

एका बाजुला गुरूसंस्थेचा बडेजांव थांबला पाहीजे परंतु त्याचबरोबर दुसऱ्या बाजूला ज्ञानव्यवहाराचे संक्रमण थांबता कामा नये अशा उद्‌देशांने जो उपदेश करण्यात येतो त्याला ज्ञानदेवानी मेधवर्षावाची उपमा दिलेली आहे.

पै. गुरू शिष्यांचा एकांती जे अक्षरा एकाची वंदती ते मेघचिया परीजगती । गर्जती सैंध।। तुकोबांनी हीच उपमा या संदर्भात वापरली मेघवुष्टीने करावा उपदेश। परी गुरूने न करावा शिष्य ( २२९०) आपल्या स्वतःच्या उपदेशाच्या स्वरूपचे स्पष्टीकरण करताना ते म्हणतात.

नव्हे हे गुरूत्व मेघवृष्टी वाणी मेघदृष्टीचे वैशिष्टय म्हणजे सुपीक नापीक जिराईत– बागाईत, शहरे खेडे अशा कोणत्याही प्रकारचा भेदाभेद अथवा आवडनिवड न करता मेघ सर्वत्र वर्षाव करतो ज्या जमिनीचा जसा कस असेल त्याचप्रमाणे तिच्यात पीक येते. नाही विचारीत, मेघ हागणदारी सेत तसे उपदेश करीत राहणे हा जणू स्वभावच व्हायला हवा आपल्या अधिकारानुरूप त्यातून जो बोध घ्यायचा तो श्रोते घेतील जसे वर्षणे हा मेघाचा स्वभाव आहे.

पर्जन्य पडावे आपुज्या स्वभावे।
आपुत्याला देव पिके भुमि ।। (२०१०)

केवळ आपण सांगितल्यामुळे लोकांमधील गुरूव्यवहार संपुष्टात येईल असे मानण्या इतके तुकोबा भाबडे नव्हते म्हणून होतकरू गुरूसांठी त्यांनी एक महत्वाचा संकेत सांगितला शिष्याने गुरूची सेवा करावी ही आजवरची रूढी तुकोबा याउलट सांगतात.

**त्याचा फळे उपदेश । आणिका दोष उफराटे ।।**

ज्याचा गुरूविषयक दृष्टिकोन मुळातच अशा प्रकारचा चिकित्सक आहे त्याच्या तडाख्यात समकलिन दांभिक आणि धंदेवाईक गुरू सापडले नाही तरच नवल.

एक करिता गुरू गुरू भोवती भारू शिष्यांची ।। पुस नाही पाय चारी । मनुष्य परी कुतरीती ।।

इतक्या कठोर शब्दात तुकोबा त्यांचा धिक्कार करतात सर्व प्राणिमात्र सारखेच आहेत सर्वामध्ये एकच परमात्मा भरलेला आहे. आपल्यासारखे इतरही आहेत तर मग गुरूशिष्यभावाला वावच कोठे आहे. असा सवाल तुकोबा वेदांत आणि गुरूला यादोहांचा एकाचवेळी पुरस्कार करणाऱ्यांना करतात

**गुरूशिष्यपण। हे अधम लक्ष्मण ।।**

**भूती नारायण खरा आप तैसाचि दुसरा ।।,**

वारकऱ्यांचा अशा धोरणामुळे ते उच्चनीच लहान थोर असा भेद न करता एकमेकांच्या पाया पडतात.

दोन्ही लेखकानी तुकारामांच्या गुरू विषयीच्या संकल्पना वेगवेगळया प्रकारांनी मांडल्या आहेत पणते दोघेही एकाच निष्कर्षा जवळ येवून पोहचात ते म्हणजे तुकारामाना कोणीही मानवी गुरू ही नव्हता.

मेघवुष्टीने करावा उपदेश परी गुरू ने करावा शिष्य

सदांनद मोरे यांनी याबाबत विवेचन दिले आहे तर आ. ह. साळुंखे यांनी उदाहरणाद्वारे आलेली तुकारामाची गुरूबद्दल भूमिका मांडली आहे.

आ. ह. साळुंखे यांनी तुकारामांची दिलेली तीन उदाहरणे

' दगडाची नाव स्वतःच पाण्यावर तारू शकत नाही तर ती इतरांना काय तारू

शकणार असा तुकारामांचा प्रश्न आहे आमच्या धार्मिक क्षेत्रातील बहुतेक गुरू हे दगडयाच्या नावे सारखे होते हे ऐतिहासिक सत्यच आहे. मग आपल्याला ते कितीही कडवट लागो या गुरूचा आश्रम घेणारा समाज पिढयात पिढया गटांगळया खात राहील बुडाला, ऱ्हास पावला यात आश्चर्य कसले? अशा पिंड शोषक गुरूंचे तोंडही पाहण्याची इच्छा नाही असे तुकाराम उद्वेगाने म्हणाले ते स्वाभिमाविकच होय स्वतःला पोहायला येत नसताना दुसऱ्याला पोहायला शिकवू पाहणारे हे लोक इतरांच्या नाशाला कारणीभूत होतात यात शंका नाही त्यांनी दिलेले माप आणि गोणीचे उदाहरणही आपल्या ज्ञान परंपरेचे रितेपण दाखविणारे आहे. रिकामे माप गोणीत व पोत्यात ओतण्याचा नुसाता अभिनय केला जात असेल तर त्या मापाप्रमाणे गोणीही दिली राहणार रिक्त पोकळ गुरूकडून ज्ञान मिळवू पाहणारा शिष्यही तसाच राहणार

दक्षिणेवर नजर ठेवणारा रिकाम्या मापा सारख्या दगडाच्या सारख्या स्वतःला पोहायला येत नसताना इतरानां पोहायला शिकवू पाहणाऱ्या मुर्खासारखा गुरू असू नये हे तुकारामांना पुन्हा पुन्हा सांगितले.

गुरू शिष्यांना माणूस म्हणून एका पातळीवर आणणे याचा अर्थ एका दृष्टीने गुरूशिष्य संबंध नाकारणे होय एकाने गुरू बनणे व दुसऱ्याने शिष्य बनणे हे अघम लक्षण होय अशा प्रकारे गुरूबद्दलची तुकारामाची भूमिका आ. ह. साळुंखे विस्तृत अनेक उदाहरणे देवून मांडतात सदानंद मोरे मात्रही चर्चा अतिशय संक्षिप्त करतात.

सदानंद मोरे यांना तुकारामा बरोबर भारतीय संस्कृतीचा वेध घ्यायचा होता त्यामुळे त्यांची प्रत्येक विषयावरील चर्चा संक्षिप्त आहे तर आ. ह. साळुंखे यांनी तुकारामाचे जे चांगुलपण नाकारले गेले आहे म्हणजेच तुकारामांच्या जीवनातील ज्या काही गोष्टी अज्ञात आहेत त्याचा वेध घेतला असल्यामुळे त्यांनी जे जे विषय मांडले आहेत त्याची त्यांनी विस्तृत चर्चा केली आहे.

दोन्हीही ग्रंथाचा आशय हा वेगवेगळा आहे मात्र मांडणीमध्ये साम्य आहे म्हणजेच एक विचार मांडताना ज्या अभंगाचे उल्लेख आहेत ते अभंग सारखेच आहे

पण दोन्हीही लेखकांचा लेखन विचार हा वेगवेगळा आहे. आ. ह. साळुंखे हे तुकारामावर झालेला अन्यय, खरा तुकाराम ज्याला समाजापासून लपवून ठेवले, तुकारामाच्या विचारातील मोठेपण आशयाचा गर्भ याची विस्तृत विवेचक मांडणी करतात स्वतःच्या अभ्यासाने ते प्रत्येक गोष्टी सत्यतेच्या कसोटीवर तपासून समजापुढे मांडतात तर सदानंद मोरे हे इतर अभ्यासकांच्या मतांचे संकलन मांडतात त्यातील गर्भ उलयडतात अल्प मांडणीमध्येच तो विषय पुरा करतात.

आ. ह. साळुंखे हे संस्कृतचे गाढे अभ्यासक असल्यामुळे त्यांनी अनेक संस्कृत ग्रंथाचे वाचन केले सत्य असत्याचा शोध होतला आहे आणि मगच त्यांनी या पुलकाची मांडणी केली आहे. मूळ शोधण्यामध्ये आ. ह. साळुंखे यांची वृत्ती दिसून येते आ. ह. नी प्रत्येक विचार सत्यतेच्या कसोटीवर कुणाचीही तमा न बागळता विचार मांडला आहे.

आ. ह. च्या वैचारिक पातळीला त्यांच्या अभ्यासाची एक उंची आहे त्यामध्ये भाव भावनेला थारा नाही त्यांचे विचार हे सकस परिपूर्ण अभ्यासाचे द्योतक आहेत.

आ. ह. नी अज्ञात तुकाराम ज्ञात करून मांडला आहे. तर सदानंद मोरे यांनी ज्ञात असलेल्या तुकारामाचे बद्दल जी मत मतांतरे मांडली आहेत त्यांचा अभ्यास करून त्यांचे संकलन मांडले आहे सदानंद मोरे यांची चौफेर अभ्यासदृष्टी यातून दिसून येते. पण मोरे यांच्या विचारात कोठेही प्रखरता दिसत नाही ते अत्यंत सौम्यपणे अलमद पणे विचार मांडतात

शेवटी प्रत्येक व्यक्तिमत्वाची स्वतःची काही वैशिष्टे असतात प्रत्येक व्यक्तिमत्वाला स्वतःच्या काही मर्यादा असतात.

विद्रोही तुकाराम लिहीत असताना लेखकांनी एक ग्रंथ म्हणून त्यांचे लिखाण केले त्यामुळे आ.ह. साळुंखे यांच्या लेखनात एकसंधपणा आहे. परंतु तुकाराम दर्शन हे सदानंद मोरे साप्ताहीक सकाळसाठी जे लेखन करीत होते दोन वर्षे केलेल्या लेखांचे सकलन असल्यामुळे या ग्रंथात एकसंधपणा जाणवत नाही.

पण दोन्हीही ग्रंथ आपापल्या परीने महत्वाचे आहे कारण एका ग्रंथत

तुकारामांच्या जीवनातील सत्य घटनांचा परामर्श घेतला आहे. ( विद्रोही तुकाराम ) तर एका ग्रंथात तुकारांचे जीवन दर्शन सांस्कृतिक परंपरेचा वेध घेत मांडले आहे. (तुकाराम दर्शन ) मोरे यांचे लिखाण बहुश्रुत पंडिताचे आहे तर साळुंखे याचें लिखाण स्वयप्रत तत्वचिंतकाचे वाटते.

वेद म्हणजे भेद आहे हे म्हणण्याचे धाडस म. फुले यांच्यात होते ती धाडसी वृत्ती आ. ह. साळुंखे यांचेकडे आहे.

सामोपचाराने संस्कृतितील विसंगती दाखवून दयावी कुणालाही दुखवू नये अशी कृती मोरे यांची आहे. परस्पर पुरक लेखन दोन्ही लेखाकांचा एक समयावच्छेदे करून समाजातील जाणत्या लोकांच्या मनावर योग्य परीणाम घडवून आणण्याचे सामर्थ्य त्यांच्यात आहे हे अभ्यासातून सिद्ध होते.

महात्मा फुले आंबेडकर, शाहू, सयाजी , विठठल शिंदे, पंजाबराव देशमुख कर्मवीर भाउराव पाटील, कर्मवीर जगदाळे मामा, जेधे जवळकर, शंकरराव मोरे, भास्करराव जाधव या सर्व व्यक्तिमत्वांना समजून घेण्यासाठी या दोन्ही ग्रंथाचा उपयोग अनंतकाळ पर्यंत टिकणारा आहे यात संशय नाही.

मार्क्सवादाचे तत्वज्ञान मानवी स्वातंत्र्याच्या हक्काच्या अधिकाराच्या जागतिक कक्षा प्रत्ययास आणून देणारे आहे विशाल सहानभुती व प्रखर न्यायबुध्दी यासाठी निष्ठुर न होता यापुढच्या काळात जागतिक पातळीवर कोणत्या दिशेने जाणे शक्य होईल याचा विचार करणारे कम्युनिष्ट आम्ही प्रॉस्टेटंट कम्युनिष्ट आाहोत. असे प्रांजळपणे सांगतात. कॉम्रेड एस. के. लिमये, दत्ता देशमुख, असे अभिमानाने म्हणतात, कॉम्रेड संताराम पाटलासारखा माणून केशवसुतांची कविता व तुकारामाची अभंगगाथा एकत्र अभ्यासाला पाहिजे त्यावर चर्चा केली पाहिजे असे सांगतात. तेव्हा तुकाराम हे महाराष्ट्राचे पूर्वसंचित आहेत.

अणुरेणुएवढा असणारा तुकाराम आकाशाचा एवढा व्यापक आहे याची अनुभुती येते. ज्ञानाची सोबत म्हणजे शहाणपणाची सोबत व ती किती आनंददायी असते हे दोन ग्रंथाच्या अभ्यासाने प्रत्ययास आले. आज विसाच्या शतकाच्या अखेरीला एकही

देश पारतंत्र्यात राहिला नाही. 21 व्या शतकात जगभर समतेचा विचार पसरवणे व जगातील सर्व देशात लोकशाही मजबुत करत जाणे हा व्यापक कार्यक्रम अंमलात आणावा लागणार आहे. त्यासाठी सर्व मतभेदांच्या पलीकडे जावून मानवतेच्या श्रेष्ठ धर्माची उपासना करणारा तुकारामासारखा संतश्रेष्ठ अधिक अधिक चर्चिला जाणे ही काळाची गरज आहे. बहुजन समाजातील दोन लेखकाने हे काम समर्थपणे केले त्यानिमित्ताने काही वाद झाले, वृत्तपत्रीय लेखन केले बेले तरी त्या लेखनाच्या निमित्ताने निर्माण झालेल्या वादाचा धुराळा कालांतराने खाली बसेल व तुकारामाचा ध्येयवाद या दोघांच्या लेखनातून समाजाला प्रेरणा देत राहील असा विश्वास या प्रकरणाच्या समारोपाच्या प्रसंगी व्यक्त करावासा वाटतो.

दोन्ही पुस्तकांची मांडणी आपापल्या परीने श्रेष्ठ आहे दोन विचारवंताची मांडणी ही दोन वेगवेगळया नद्यांप्रमाणे आहे. नद्यांचा शेवट समुद्र त्याचप्रमाणे या दोन्ही नद्या या तुकारामाशी एकरूप झाल्या आहेत विचारधारा वाटा वेगवेगळया आहेत आलेले अडथळे वेगवेगळे आहे. भेटलेला निसर्ग झालेली उंच सखल मांडणी वेगवेगळी आहे.

एक सातारा जिल्हयात उगम पावली आहे तर एक पुणे जिल्हयात त्यामुळे प्रत्येकीचा घाट वेगळा आहे त्यांच्या घाटाला एकत्र करणे चुकीचे कारण ते घाट आपापल्या परीने त्यांच्या अंतिम ध्येयापर्यंत जाणून पोहोचले आहेत.